**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
1579/का-6 **मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
9/10/2007 **दिनांक- ८ ऑक्टोबर, २००७.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने मे. इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया लि., हैद्राबाद या केंद्र शासनाच्या व्यवसायाकडे विकसित करुन घेतलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये करण्यात येतो. नगर परिषदा व नगर पंचायतींसबंधी या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या वापरासंबंधीचे आदेश दिनांक- १३ एप्रिल, २००४ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. महानगरपालिकांमध्ये या यंत्राच्या वापरासंबंधीचे आदेश दिनांक- ७ जानेवारी, २००५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये या मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याचे आदेश दिनांक- ३ मे, २००५ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत व ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये या मतदान यंत्राद्वारे मतदान करण्यासंबंधीचे आदेश दिनांक- २८ मार्च, २००७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. या सर्व आदेशांमध्ये निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची काढता येणारी मेमरी सील करुन त्या शासकीय कोषागारात ठेवण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. शासकीय कोषागारात किंवा उपकोषागारात मेमरी ठेवण्यामागे उद्देश एवढाच आहे की, त्या मेमरी पूर्णतः सुरक्षित राहाव्यात. अन्य ठिकाणी त्या ठेवल्यास त्यांच्या सुरक्षिततेची पूर्ण हमी देता येणार नाही. निवडणुकीचा निकाल लागल्यापासून तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतर जे प्रभाग किंवा मतदार गट/मतदार गण यांच्याबाबत निवडणूक याचिका दाखल झालेल्या नसतील अशा प्रभागांच्या किंवा मतदार गट/मतदार गणाच्या निवडणुकीसंबंधी मेमरी कोषागारातून काढून घेण्यात येतात. जेणेकरुन त्या मेमरी पुन्हा मतदान यंत्रामध्ये घालून मतदान यंत्र अन्य निवडणुकीसाठी वापरता येऊ शकते.

२. राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषदा/नगर पंचायती, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या व ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या वापरासंबंधीच्या काढलेल्या सर्व आदेशांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, या मेमरी जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात असतील. महानगरपालिकांच्या निवडणुकीमधील मेमरी महानगरपालिका आयुक्त व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात असतील. याचाच अर्थ असा की, जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांना स्वतः किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना मेमरी काढण्यासंबंधी पूर्ण अधिकार असतील. परंतु, कोषागार अधिकार किंवा उप कोषागार अधिकारी ज्या अधिकाऱ्यांच्या सहीने मेमरी कोषागारात ठेवण्यात आल्या आहेत त्याच अधिकाऱ्याच्या सहीने पत्र दिल्यास मेमरी काढू देतात. बऱ्याचदा अशा अधिकाऱ्याची बदली झालेली असते, त्यावेळी मेमरी काढून घेणे अडचणीचे ठरते. या कारणास्तव राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

252

D:\CORPORATION\aab-order.doc

कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक झाल्यानंतर त्या निवडणुकीत वापरण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मेमरी कोषागारात किंवा उपकोषागारात ठेवण्यात येतात. निवडणुकीच्या निकालानंतर तीन महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर ज्या प्रभाग, मतदार गट/मतदार गणाच्या बाबतीत निवडणूक याचिका प्रलंबित नसतील अशांच्या संबधित मेमरी काढून घेण्यासाठी पुढील अधिकारी सक्षम असतील :-

१) महानगरपालिकांच्या बाबतीत मेमरी काढण्याच्यावेळी कार्यरत असणारे महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले उपायुक्त,
२) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या बाबतीत मेमरी काढण्याच्यावेळी कार्यरत असणारे जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले उप जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार,
३) नगर परिषदा/नगर पंचायती यांच्या बाबतीत मेमरी काढण्याच्यावेळी कार्यरत असणारे मुख्याधिकारी
४) ग्रामपंचायतीबाबत मेमरी काढण्याच्यावेळी कार्यरत असणारे जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले उप जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार

हेच आदेश ज्या निवडणूक याचिकांचे निकाल लागले आहे त्या याचिकांशी संबंधित प्रभाग किंवा मतदार गट/मतदार गण यांच्या मेमरी काढण्याबाबतदेखील लागू राहतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व महानगरपालिका आयुक्त,
२) सर्व विभागीय आयुक्त,
३) सर्व जिल्हाधिकारी
४) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, **मुंबई**
५) उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी
७) सर्व मुख्याधिकारी
८) उप संचालक, कोषागारे
९) सर्व तहसिलदार
१०) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

253